# माहे जुलै २०२१ मासिक अहवाल
## खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव/जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे ग्रामीण | बेली | १. पोहवा / २४८२ आर. बी. गवळी<br>२. पोशि / ९७९ एम. बी. चव्हाण | भोईवाडा पो. स्टे. गु.र.नं. ३६/२०२१ भादवि कलम ३०२, ३६३ अन्वये हा गुन्हा दि.१४.०७.२०२१ रोजी १४:०० ते दि.१५.०७.२०२१ रोजी ०२:५० वा. चे दरम्यान घडला असून दि.१५.०७.२०२१ रोजी ००:०६ वा. दाखल करण्यात आलेला आहे.<br>सदर गुन्हयामध्ये फिर्यादींचा मुलगा नामे सत्यम नंदकुमार मधेशिया, वय ८ वर्षे, हा ४ थ्या मजल्यावर मयत स्थितीत मिळून आला.<br>श्वान पथकास बोलविल्यावरुन घटनास्थळी मयताच्या अंगावर टाकलेली हिरव्या लाल रंगाची मळकटलेली चादर मिळून आल्याने सदर चादरीचा वास श्वान बेली हिस दिला असता श्वान बेली ही घटनास्थळी इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील मोकळया जागेतून माग काढत तिस-या मजल्यावर येऊन तेथील घरासमोरील मोकळया जागेत सर्वत्र फिरुन घुटमळू लागली. श्वान बेली ही चादरीच्या वासावरून इमारतीच्या खाली न येता चौथ्या व तिस-या मजल्यावरील मोकळया जागेतच घुटमळून थांबल्याने त्या इमारतीतील ६ संशयित इसमांना खात्री करण्यासाठी श्वान बेली मार्फत ओळखपरेड करणेकरिता ताब्यात घेतले. त्या सर्वांना अर्धगोलाकार उभे करुन श्वान बेलीला चादरीचा वास दिला असता ओळख परेड दरम्यान श्वान बेलीे अ.क्र.६ वरील इसमाच्या अंगावर उडी मारुन तिथेच थांबली. पुन्हा खात्री करण्यासाठी त्या इसमास अ.क्र.१ वर थांबविले असता श्वान बेली त्याच इसमाजवळ जाऊन थांबली. सदर संशयित इसमाचे नाव जिंतेंद्रकुमार टिकेरीलाल मधेशिया, वय-२१, रा-जेव्हीसी, कॉम्प्लेक्स, चिराग शेठ यांची बिल्डींग, तिसरा माळा, कारिवली, भिवंडी, जि. ठाणे असे सांगितले.<br>अशा प्रकारे मयताचा खून करणा-या आरोपीचा श्वान बेलीच्या मदतीने शोध लागल्याने सदरील गुन्हा उघडकीस येण्यास मदत झाली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव/जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २. | रत्नागिरी | ॲलेक्स - स्फोटक शोधक | १. पोहवा/९४३<br>दत्तात्रय दिपक कुंभार | नाटे सागरी पो.स्टे. गु.र.नं.१६१/२०२१, भादवि कलम २८६, भारतीय बारी पदार्थ अधिनियम १९०८ चे कलम ५ अन्वये हा गुन्हा दि.२९.०७.२०२१ रोजी ११:०० वा. चे दरम्यान घडला असून दि.२९.०७.२०२१ रोजी २२:३७ वा. दाखल करण्यात आलेला आहे.<br>दि.२९.७.२१ रोजी १०:०० वा. चे दरम्यान मौजे मिठगावणे, ता.राजापूर, जि.रत्नागिरी गावचे राहणारे सिध्देश गोपीनाथ कांबळे हा त्यांची गुरे घेऊ चरण्यासाठी जात असताना त्यास मिठगावणे गावचे सडयावर असलेल्या जमिन स.नं.१०५ या ठिकाणी डुक्कराच्या शिकारीसाठी कोणीतरी अज्ञात इसमाने गावठी बॉम्ब ठेवलेला असल्याचे पाहिले. त्यानंतर त्याने सदरची बाब पोलीस पाटील यांना सांगितल्याने पोलीस पाटील श्री. गजानन भोगले यांनी त्याबाबत पोलीस ठाण्यात कळविले. त्या गावठी बॉम्बमुळे मागणांच्या व जनावरांच्या जिवितास धोका नाकारता येत नसल्याने सदर ठिकाणी सापडलेल्या गावठी बॉम्ब सदृश वस्तुमध्ये स्फोटक पदार्थ आहे अगर कसे याची खात्री करण्याकरिता नाटे सहकारी पोलीस ठाण्यामार्फत बीडीडीएस रत्नागिरी टिमला घटनास्थळी बोलाविले.<br>श्वान ॲलेक्स याने घटनास्थळी पडलेल्या गावठी बॉम्ब सदृश वस्तु जवळ जाऊन वास घेतला व तेथे बसून सदर गावठी बॉम्ब सदृश वस्तुमध्ये स्फोटक पदार्थ असल्याचा संकेत दिला. श्वानाने दिलेल्या संकेतावरुन त.अं. यांना सदर गावठी बॉम्ब सदृश वस्तुमध्ये स्फोटक पदार्थ असल्याची खात्री झाली.<br>अशा प्रकारे श्वान ॲलेक्सच्या मदतीने बॉम्ब सदृश वस्तुमध्ये स्फोटक पदार्थ असल्याची खात्री झाली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३. | रत्नागिरी | रॅम्बो -गुन्हे शोधक | १. पोहवा/३१७<br>बी. ए. राणे<br>२. पोहवा/८३१<br>व्ही. सी. आंब्रे | संगमेश्वर पो.स्टे. गु.र.नं.१०९/२०२१, भादवि कलम ४५७,३८० अन्वये हा गुन्हा दि.१४.०७.२०२१ रोजी २०:०० वा. ते २२:०० चे दरम्यान घडला असून दि.१५.०७.२०२१ रोजी १४:१३ वा. दाखल करण्यात आलेला आहे.<br>घटनास्थळी पडलेल्या स्क्रु ड्रायव्हरचा वास श्वान रॅम्बो यास दिला असता श्वान घटनास्थळावरुन निघून उत्तर दिशेला पाखाडी (पाय-यांची वाट) चढून डावखोल ते जाकादेवी जाणारे रोडवर आला व जाकादेवीकडे जाणारे रोडने वास घेत सुमारे १२० मीटर अंतरावर जाऊन रस्त्याचे डावे बाजूला असलेले पाखडीने वर चढून विलास महादेव शिंदे यांचे राहते घरासमोरुन जाऊन तसाच पुढे पाखाडीने वर चढून अरविंद महादेव शिंदे यांचे मालकीचे डावखोल ग्रा.पं. घर नं.६६ चे अंगणात घुटमळून भुंकू लागला.<br>श्वान करत असलेल्या मार्गदर्शनावरुन त.अं. यांनी सदर घरात राहणा-या संशयित इसम नामे रुपेश अरविंद शिंदे याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त.अं. यांनी संशयिताकडे सखोल चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली.<br>अशा प्रकारे श्वान रॅम्बोचा सदरचा गुन्हा उघडकीस येण्यास मदत झाली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | लोहमार्ग मुंबई | मोती | १. पोहवा/३०८१ गावकर<br>२. पोना/२४ गोळे | कल्याण रे.पो. ठाणे, गु.र.नं.४८७/२०२१, भादवि कलम ३०२,३०७ अन्वये हा गुन्हा दि.०३.०७.२०२१ रोजी १०:३० वा. चे दरम्यान घडला असून दि.०३.०७.२०२१ दाखल करण्यात आलेला आहे.<br>कल्याण रेल्वे पोलीस ठाणे हद्दीतील कल्याण रेल्वे स्थान फलाट क्र.०१ वर सीएसटी कडील बाजूचे टोकास एक अज्ञात इसमाने कोणत्यातरी धारदार शस्त्राने बळीताच्या मानेवर वार करुन जिवे मारले व फरार झाला. घटनास्थळी मयत इसमापासून अंदाजे १० ते १२ फुटावर संशयित आरोपीची चप्पल पडलेली होती. सदर चप्पलचा वास श्वान मोतीस दिला असता त्याने घटनास्थळावरुन वास घत प्रथम येणा-या पादचारी पुलावर चढून पुढे वास घेत-घेत फलाट क्र.०४ वर उतरणा-या पाय-यांजवळ येऊन थांबला. त्यास पुन्हा चप्पलचा वास दिला असता त्याच जागी घुटमळू लागला. श्वान मोती याने आरोपी पळालेला मार्ग दाखविला. त्या अनुषंगाने सीसीटिव्ही फुटेज तपासून पाहिले असता संशयित आरोपी हा घटनास्थळावरुन पळत प्रथम येणा-या पादचारी पुलावर चढून फलाट क्र.०४ येथे उतरणा-या पाय-या वरुन उतरुन अज्ञात रेल्वेने पसार झालेबाबत निष्पन्न झाले.<br>दि. १२.०७.२०२१ रोजी सदर आरोपी नामे अशोक गुलाबसिंह लोवन्स ऊर्फ गुंगा यास अटक करण्यात आलेली असून श्वान मोतीच्या मार्गदर्शनावरुन गुन्हा उघडकीस येण्यास व आरोपीस अटक करण्यास मदत झाली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ५ | यवतमाळ | कॅडी | १. पोहवा /१०६४ मधुकर तोडसाम<br>२. पोना /१४६२ सुनिल पजगाडे | कळंब पो. स्टे, गु.र.नं. ३६८/२०२१, भादवि कलम ४५७, ३८० अन्वये हा गुन्हा दि.०९.०७.२०२१ रोजीचे १७:३० ते २३.३० वा. चे दरम्यान घडला असून दि.१०.०७.२०२१ रोजी ०४.५९ वाजता दाखल करण्यात आलेला आहे.<br>सदर गुन्हयातील घटनास्थळावरील टिकाव व चावीचा गुच्छा मिळून आला प्रथम चावीच्या गुच्छाचा वास श्वान कॅडी हीस दिला असता श्वान श्वान बंगल्याचे रूम मध्ये फिरून बाहेर आली. त्यानंतर ओळखपरेड करीता टिकावाचे लाकडी दांडयाचा वास श्वान कॅडीस देवुन सोडले असता श्वान कॅडी हीने ०५ नंबरवर उभा असलेली इसमाचे छातीवर समोरील दोन्ही पाय ठेवून उडी मारून इशारा दिला नंतर पुन्हा संशयीत इसमांची जागा अदली बदली करून पुन्हा ओळखपरेड घेतली असता पुन्हा त्याच इसमाचा इशारा दिला.<br>तपासी अंमलदारांनी सदर इसमाकडे तपास केला असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले. अशाप्रकारे श्वान कॅडीच्या मार्गदर्शनावरुन गुन्हा उघडकीस येण्यास मदत झाली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ६ | यवतमाळ | कॅडी | प्रभारी अधिकारी सफौ / ५६४ चंद्रकांत अन्वीकर<br>१. पोहवा /१०६४ मधुकर तोडसाम<br>२. पोना /१४६२ सुनिल पजगाडे | बाभूळगाव पो. स्टे, गु.र.नं. २७९/२०२१, भादवि कलम ३०२ अन्वये हा दि.०४.०७.२०२१ रोजीचे ०१:१५ ते ०१.४५ चे दरम्यान घडला असून दि.०४.०७.२०२१ रोजीचे ११:३६ वाजता दाखल करण्यात आलेला आहे.<br>सदर गुन्हयामध्ये संशयीताने पत्नीस डोक्यावर बाजीचे लाकडी दांडयाने मारून ठार केले असून ओळखपरेड करीता घटनास्थळावरील लाकडी दांडयाचा वास श्वान कॅडीस देवुन सोडले असता श्वान कॅडी हीने ०२ नंबरवर उभा असलेली इसमाजवळ जावून भुंकून इशारा दिला नंतर पुन्हा संशयीत इसमांची जागा अदली बदली करून पुन्हा ओळखपरेड घेतली असता पुन्हा त्याच इसमाचा इशारा दिला.<br>तपासी अंमलदारांनी सदर इसमाकडे तपास केला असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले. अशाप्रकारे श्वान कॅडीच्या मार्गदर्शनावरुन गुन्हा उघडकीस येण्यास मदत झाली. |




**अशा प्रकारे माहे जुलै २०२१ मध्ये खुन - ०३, घरफोडी - ०२, स्फोटक पदार्थ कायदा - ०१**
**<u>असे एकुण = ०६ गुन्हे श्वान पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत.</u>**